राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान Non-Intensive NRLM प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा व तालुका कक्ष निर्माण करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः मजिअ-२०१३/प्र.क्र.३६/यो.३**

बांधकाम भवन, मुंबई ४०० ००१

दिनांक : २० मार्च, २०१३

वाचा —

१) **शासननिर्णयक्रमांकः**एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/यो.३, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दि. १८/७/२०११

२) **शासननिर्णयक्रमांकः**एनआरएलएम-२०१२/प्र.क्र.४२/यो.३, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दि. ३१/०३/२०१२

३) **शासननिर्णयक्रमांकः**एनआरएलएम-२०१२/प्र.क्र.२४८/यो.३, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दि. ०७/११/२०१२

**प्रस्तावना :-**

ग्रामीण भागातील दारिद्रय रेषखालील कुटूंबांना स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या माध्यमातून बचत गटांना एकत्र आणून त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावून त्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. या कार्यक्रमात बचत गटाद्वारे स्वंयरोजगारीचे संघटन, प्रशिक्षण व कौशल्यवृध्दी, पतकर्ज, मुलभूत सुविधा आणि पणन यासारखे पुरक कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आले होते. वरील योजनेमध्ये स्वतंत्र (Independent), समर्पित व संवेदनशील यंत्रणेच्या अभावामुळे आणि बचतगटाची

संस्थीय प्रणाली विकसित होऊ न शकल्यामुळे सदरील योजनेत अमुलाग्र बदल करण्यात आला आहे. केंद्र शासनाने जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने बचतगटाच्या संस्थीय प्रणालीवर भर देऊन, क्षमता बांधणी व जाणीव जागृती यावर लक्ष केंद्रीत करणारे "राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान" अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान ही स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली आहे.

सदरील अभियान पहिल्या टप्प्यात Intensive पध्दतीने १० जिल्हयांतील ३६ तालुक्यात राबविण्यात येत असून उर्वरित सर्व तालुक्यात Non-Intensive पध्दतीने राबविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. टप्प्याटप्प्याने Non-Intensive तालुक्यांचा समावेश Intensive मध्ये होईल. Non-Intensive मधील तालुके Intensive मध्ये रुपांतरीत होताना त्या भागातील स्वयंसहायता गटांची किमान क्षमता बांधणी होणे अपेक्षित आहे. Intensive NRLM ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा व तालुका कक्ष निर्माण करण्याबाबतचा निर्णय संदर्भीय शासन निर्णय क्र.२ अन्वये घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत स्वयंसहायता गटांच्या क्षमता बांधणीसाठी उपलब्ध मनुष्यबळ अपुरे पडत आहे. Non-Intensive NRLM चे प्रभावी काम करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा व तालुका कक्ष निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय—

राष्ट्रीय ग्रामीण जिवनोन्नती अभियानाची Non-Intensive पध्दतीने राबविण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA) व तालुकास्तरावर पंचायत समिती ही

अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम करेल, तसेच स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा व तालुकास्तरावर उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाची क्षमतावृध्दी करून त्यांचा उपयोग करून त्यांची नॉन — इंटेसिव्ह (Non-Intensive) NRLM राबविण्याचा निर्णय शासनाने संदर्भीय शासन परिपत्रक क्र.३ अन्वये घेतला आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हा कक्ष व तालुका स्तरावर तालुका कक्षाची निर्मीती करण्याबाबतचा निर्णय खालीलप्रमाणे घेण्यात येत आहे.

**जिल्हा कक्षाची निर्मिती**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत Non-Intensive कक्ष स्थापन करण्यात येईल.

**जिल्हास्तर कक्षाची रचना**

| अ.क्र. | शाखेचे नाव | सध्याच्या पदाचे नाव | अभियान पदाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | | मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हा अभियान संचालक |
| २ | व्यवस्थापन शाखा | प्रकल्प संचालक | सह जिल्हा अभियान संचालक |
| ३ | स्वरोजगार शाखा | सहायक प्रकल्प अधिकारी, (पशुसंवर्धन) | जिल्हा समन्वयक (स्वरोजगार) |
| ४ | | सहायक प्रकल्प अधिकारी, (उद्योग) | जिल्हा समन्वयक (स्वरोजगार) |
| ५ | रोजगार शाखा | सहायक प्रकल्प अधिकारी, (रोजगार) | जिल्हा समन्वयक (रोजगार) |
| ६ | पाणलोट शाखा | सहायक प्रकल्प अधिकारी, (कृषी) | जिल्हा समन्वयक (स्वरोजगार) |
| ७ | महिला शाखा | सहायक प्रकल्प अधिकारी, (महिला) | जिल्हा समन्वयक (महिला) |
| टीप:- या शाखेअंतर्गत असणारे गट क मधील तांत्रिक सहायक, सांख्यिकी सहायक, लिपिक — टंकलेखक इत्यादी हे या अभियानांतर्गत काम करतील. | | | |

या अधिकाऱ्यांमधील कार्यतत्पर व उत्साही सहायक प्रकल्प अधिकारी यांची जिल्हा अभियान समन्वयक म्हणून निवड करावी. ते दैनंदिन समन्वयाचे काम करतील. सदरील कक्ष हा प्रकल्प संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली काम करेल. कक्षातील सर्व सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांना मार्गदर्शक व सनियंत्रणाच्या सोयीसाठी तालुके वाटप करुन देण्यात यावे. वरील पदामधील जी पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत. ती पदे संदर्भीय शासन निर्णय २ अन्वये कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर ११ महिन्याच्या कालावधीसाठी एकत्रित मानधनावर तात्काळ विहित पध्दतीचा अवलंब करून भरण्यात येतील. सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी अधिकारी /कर्मचारी यांच्या कराराची मुदत संपल्यानंतर अभियानामध्ये जिल्हा समन्वयक या पदावर कंत्राटी पध्दतीने स्वतंत्र जाहिरात काढून नेमणूक करण्यात यावी. यासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता आणि मानधन व भरती करण्याची कार्यपध्दती बाबत स्वतंत्र आदेश काढण्यात येतील.

**तालुका कक्षाची निर्मिती**

**Non-Intensive तालुक्यात गटविकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरावर NRLM (Non-Intensive) कक्षाची स्थापना करण्यात यावी. या कक्षात विस्तार अधिकारी (SGSY) यांना विस्तार अधिकारी (समुदाय संघटन व क्षमता बांधणी) व विस्तार अधिकारी (उद्योग) यांना विस्तार अधिकारी (Livelihoods and Bank Linkage ) असे संबोधण्यात येईल. गटस्तरावर विस्तार अधिकारी (एसजीएसवाय व उद्योग) यांच्या जागा रिक्त असतील तर त्या जागा कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी वेगळयाने आदेश काढण्यात येतील. या विस्तार अधिकाऱ्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर पुढील आदेशांपर्यंत नव्याने भरती करण्यात येऊ नये. तालुकास्तरावरील कक्षात वरील दोन विस्तार अधिकारी व दोन गट समन्वयक यांचा समावेश असेल. तालुका कक्षात दोन गट समन्वयकांची पदे तात्काळ कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर ११ महिन्याच्या कालावधीसाठी एकत्रित मानधनावर भरण्यात यावीत. यासाठी पुढील प्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येईल.**

**गट समन्वयकांची पदे भरतीबाबतचे निकष**

- उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापिठातून सोशल सायन्स अथवा समाजकार्य (B.S.W) शाखेतून पदवी उत्तीर्ण असावा. सोशल सायन्स अथवा समाजकार्य (M.S.W) किंवा Master in Business Administration (MBA) किंवा Post Graduation Diploma in Rural Development मध्ये पदव्युत्तर असल्यास उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच उमेदवार MS-CIT उत्तीर्ण असल्यास प्राधान्य देण्यात यावे.
- ग्रामीण भागात दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम, स्वयंसहायता गट स्थापना, क्षमता बांधणी, संस्थीय बांधणी, प्रशिक्षण गरज ओळखणे (Training Need Assessment), प्रशिक्षण आराखडा तयार करणे, विविध स्तरावर प्रशिक्षणाचे आयोजन, गटांचे लेखे अद्ययावत ठेवणे, Bank Linkage, लोकसहभागावर आधारीत योजना इ. कामाचा ३ वर्षाचा शासकीय कार्यालय किंवा स्वयंसेवी संस्थेतील कामाचा अनुभव असावा.
- उमेदवाराचे वय शासनाने विहित केलेल्या वयोमर्यादेप्रमाणे असावे.
- मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.
- उमेदवाराकडे नेतृत्व, संवाद, संघटन बांधणी व व्यवस्थापन, विश्लेषण कौशल्य असावेत.

**कर्तव्ये व जबाबदाऱ्या**

विस्तार अधिकारी (समुदाय संघटन व क्षमता बांधणी) व विस्तार अधिकारी (Livelihood & Bank Linkage) आणि गट समन्वयक यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या परिशिष्ट क्र.२ मध्ये जोडण्यात आल्या आहेत. त्यानुसार ते, ती कार्य करतील.

**मानधन व भत्ते**

कंत्राट पध्दतीने नेमण्यात येणारे गट समन्वयक या पदासाठी दरमहा एकत्रित मानधन रु. १८,०००/- व एकत्रित प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता म्हणून दरमहा रु. २०००/- अभियानामार्फत निश्चित करण्यात येत आहे. सदरील खर्च हा NRLM च्या उपलब्ध निधीतील संस्था बांधणी/क्षमता बांधणी व प्रशिक्षण या शिर्षाखाली अदा करण्यात येईल.

**कंत्राटी पध्दतीने निवड पध्दत, प्रक्रीया आणि वेळापत्रक**

गट समन्वयकाची निवड कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर स्पर्धात्मक पध्दतीने करण्यात यावी. यासाठी राज्यस्तरीय/विभागस्तरीय एक व जिल्हास्तरावरील जास्त खपाचे एक अशा दोन मराठी वृत्तपत्रातून तसेच जिल्हयाच्या वेबसाईटवरून जाहिरातीस पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी. जाहिरातीचा नमूना परिशिष्ट क्र. ३ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उमेदवारांकडून परिशिष्ट क्र.४ च्या नमून्यामध्ये अर्ज मागविण्यात यावेत. अर्जाचा नमूना जिल्हयाच्या वेब साईटवर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व पंचायत समितीमध्ये मोफत वितरणासाठी उपलब्ध करून ठेवावा. प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी व मौखिक परिक्षा घेवून गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात येईल. सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र.१ अन्वये गटसमन्वयकांची भरती प्रक्रिया करण्यात येईल.

वरील प्रमाणे पदांची निवड करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांच्या अध्यक्षतेखाली खालील समिती नेमण्यात येईल.

| | |
|---|---|
| १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - | अध्यक्ष |
| २. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा- | सदस्य सचिव |
| ३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) | सदस्य |
| ४. समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद - | सदस्य |
| ५. महिला प्रतिनिधी (विभाग प्रमुख, जि.प./ गट विकास अधिकारी) | सदस्य |
| ६. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान प्रतिनिधी - | सदस्य |

**वरील सर्व पदे हे अभियानासाठी तज्ञ म्हणून काम करतील. ही शासनाच्या कोणत्याही श्रेणीतील किंवा संवर्गातील पदे नाहीत. ही सर्व पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर भरण्यात येत असल्यामुळे ते कधीच कोणत्याही नियमित शासकीय पदांवर हक्कदार राहणार नाहीत.**

## करारनामा

निवड प्रक्रीयेतून पात्र ठरलेल्या उमेदवारांनी निवडीनंतर सात दिवसाच्या आत अभियान कक्षाकडून पुरविण्यात आलेल्या करारनाम्याच्या नमुन्यात रु. १०० च्या बाँड पेपरवर करार करणे आवश्यक राहील. करारनाम्याचा नमुना राज्य अभियान कक्षाकडून स्वतंत्रपणे देण्यात येईल. तसेच निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उमेदवारांनी पायाभूत प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण केल्यानंतरच त्यांना पदस्थापना देण्यात येईल.

## क्षमता बांधणी कार्यक्रम

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा व तालुका कक्षात कार्यरत असलेले सहाय्यक प्रकल्प अधिकारी, विस्तार अधिकारी व गट समन्वयक आणि इतर कर्मचारी यांना वेळोवळी गरजेनुसार प्रशिक्षण दिले जाईल. तसेच त्यांच्यासाठी अभ्यास दौऱ्याचे आयोजन राज्य मिशन व्यवस्थापन कक्षाकडून केले जाईल. या सर्व क्षमता बांधणी कार्यक्रमांना वरील अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थित राहणे बंधनकारक असेल. सदरील अभियानासाठी उपलब्ध होणाऱ्या मनुष्यबळास मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या मान्यतेशिवाय अभियानाव्यतिरीक्त कामे देण्यात येवू नये.**

## निवड प्रकियेचा खर्च

गट समन्वयकांची पदे भरण्यासाठी घेण्यात येणाऱ्या निवड प्रक्रियेसाठीचा खर्च हा NRLM (Non Intensive) अंतर्गत उपलब्ध ५% प्रशासकीय निधीमधून करण्यात यावा.

## संनियंत्रण व अहवाल

राज्य मिशन व्यवस्थापन कक्षामार्फत देण्यात येणाऱ्या MIS Template मध्ये प्रत्येक विस्तार अधिकारी व गट समन्वयकांनी त्यांचा मासिक प्रगती अहवाल गट विकास अधिकारी यांच्यामार्फत प्रकल्प संचालक यांना दरमहा ५ तारखेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

जिल्हा समन्वयक त्यांचा मासिक प्रगती अहवाल प्रकल्प संचालक यांना ५ तारखेपर्यंत सादर करतील. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हे संकलित अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत राज्य मिशन व्यवस्थापन कक्षास सादर करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साइटवर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१३०३२०१२५००५५८४२० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gite Naresh Bhagwanrao

Digitally signed by Gite Naresh Bhagwanrao
DN: CN = Gite Naresh Bhagwanrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = RDD
Reason: I am approving this document
Date: 2013.03.28 11:39:30 +05'30'

**( डॉ.नरेश गिते )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,

२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव

४. मा. मुख्यसचिव यांचे सहसचिव

५. सचिव, नियोजन/वित्त/सामाजिक न्याय/आदिवासी विकास/महिला व बाल कल्याण/सहकार/कृषी व पदुम/उद्योग,उर्जा व कामगार/शालेय शिक्षण / उच्च व तंत्रशिक्षण/रोजगार व स्वयंरोजगार, मंत्रालय, मुंबई.

६. महासंचालक, राजमाता जिजाऊ माता बालआरोग्य व पोषण मिशन, संचालक (NRHM)

७. महालेखापाल (लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर (पाच प्रतींसह)

८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर (पाच प्रतींसह)

९. सर्व विभागीय आयुक्त

१०.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

११.सर्व जिल्हाधिकारी,

१२.व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, बांद्रा (प.), मुंबई.

१३.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

१४.सर्व उपायुक्त (आस्थापना / विकास) विभागीय आयुक्त यांचे कार्यालय

१५.सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

१६.गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

१७.संचालक, युनिसेफ/ SIRD, पुणे

१८. जनरल मॅनेजर व निमंत्रक, राज्य अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे

१९.आयुक्त, महिला व बाल विकास समिती

२०.अध्यक्ष, नाबार्ड, बांद्रा (पूर्व), मुंबई

२१.निवडनस्ती

## परिशिष्ट क्र.१

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत Non-Intensive तालुक्यांतर्गत गट समन्वयक भरती वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | जिल्हास्तरावरून वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणे | एप्रिल २०१३ चा पहिला आठवडा |
| २ | अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख | एप्रिल २०१३ चा तिसरा आठवडा |
| ३ | अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | एप्रिल २०१३ चा चौथा आठवडा |
| ४ | उमेदवाराकडून हरकती नोंदवणे | एप्रिल २०१३ चा चौथा आठवडा |
| ५ | हरकतींचा निपटारा करणे | एप्रिल २०१३ चा चौथा आठवडा |
| ६ | लेखी परिक्षेसाठी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | एप्रिल २०१३ चा चौथा आठवडा |
| ७ | लेखी परिक्षेचे आयोजन | मे २०१३ चा दुसरा आठवडा |
| ८ | लेखी परिक्षेचा निकाल जाहिर करणे | मे २०१३ चा दुसरा आठवडा |
| ९ | मौखिक परिक्षांचे आयोजन | मे २०१३ चा तिसरा आठवडा |
| १० | अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे | मे २०१३ चा तिसरा आठवडा |

## परिशिष्ट क्र. २

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत Non-Intensive तालुक्यांतर्गत गट समन्वयक यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या

अ) **विस्तार अधिकारी (समुदाय संघटन व क्षमता बांधणी )**

१. महिन्यातील प्रत्येक सोमवार वगळता इतर सर्व कामकाजाच्या दिवशी क्षेत्र भेटी करणे आवश्यक आहे. महिन्यात किमान १० दिवस गावांमध्ये मुक्काम करणे आवश्यक आहे.

२. बचत गटांची स्थापना व गटांनी पंचसुत्रीचा अवलंब करावा यासाठी त्यांना नियमित मार्गदर्शन करणे.

३. बचत गटांच्या बैठकांना नियमित उपस्थित राहणे व दस्तावेज तपासणी करून त्यांना सुधारणा सुचविणे.

४. गटांची गुणवत्ता वृध्दींगत होण्याच्या दृष्टीने तालुका ते ग्रामस्तरापर्यंत अभियानासंबंधित सर्व घटकांची प्रशिक्षण गरज (Training Need Assessment- TNA) करणे व त्यानुसार प्रशिक्षणाचे मोड्युल, साहित्य विकसित करणे व तालुक्याचा गावनिहाय क्षमता बांधणी आराखडा तयार करून त्यानुसार गटांची क्षमता बांधणी करणे.

५. बचत गटांशी सुसंवाद साधणे, संस्थात्मक बळकटी करणे, क्षमतावृध्दी करणे, गटांना प्रोत्साहीत करण्याची जबाबदारी पार पाडणे.

६. बचत गटांच्या बळकटीकरण / सक्षमीकरण करण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे.

७. तालुक्यातील गटांची दर तीन महिन्यांनी प्रतवारी तयार करणे.

८. गट विकास अधिकारी यांना दरमहा अहवाल सादर करणे.

**Livelihoods & Bank linkage)) ब) विस्तार अधिकारी**

१. महिन्यातील प्रत्येक सोमवार वगळता इतर सर्व कामकाजाच्या दिवशी क्षेत्र भेटी करणे आवश्यक आहे. महिन्यात किमान १० दिवस गावांमध्ये मुक्काम करणे आवश्यक आहे.

२. बचत गटांनी पंचसुत्रीचा वापर करावा यासाठी गटांना नियमित मार्गदर्शन करणे.

३. गटांतील प्रत्येक सदस्यांचा Micro Investment plan तयार करण्यासाठी सदस्यांना सहाय्य करणे.

४. बँकांसोबत समन्वय करून बचत गटांना नियमित पतपुरवठा करणे.

५. बचत गट खरेदी करत असलेल्या सामुग्री बाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे.

७. बचत गटांसाठी शाश्वत उपजीविकेचे पर्याय उपलब्ध करून देणे.

८. गटांच्या वस्तुंच्या पणन मार्केटिंग बाबत सहकार्य करणे.

९. बचत गटांच्या बैठकांना उपस्थित राहणे व दस्तावेज तपासणी करून त्यांना सुधारणा सूचविणे.

१०. गट विकास अधिकारी यांना दरमहा अहवाल सादर करणे.

**क) गट समन्वयक**

१. महिन्यातील प्रत्येक सोमवार वगळता इतर सर्व कामकाजाच्या दिवशी क्षेत्र भेटी करणे आवश्यक आहे. महिन्यात किमान १५ दिवस गावांमध्ये मुक्काम करणे आवश्यक आहे.

२. बचत गटांनी पंचसुत्रीचा अवलंब करावा यासाठी गटांच्या बैठकांना नियमित उपस्थित राहून मार्गदर्शन करणे.

३. अस्तित्वातील स्वयंसहायता गटांचे दर्जा निश्चित करण्यासाठी दरमहा प्रतवारी (Gradation) ठरविणे. त्यासाठी आवश्यक तक्ते विकसित करणे व प्रतवारीची प्रक्रीया दरमहा करणे, गटांची गुणवत्ता वृंध्दिंगत करणे.

४. समुदायात उत्कृष्ट काम करणाऱ्या उत्साही व नेतृत्व गुण असणाऱ्या व्यक्ती (Best Practitioners) व बुक किपरचा शोध घेणे, प्रशिक्षण देवून त्यांची क्षमता बांधणी करणे.

५. तालुका ते ग्रामस्तरापर्यंत अभियानासंबंधित सर्व घटकांची प्रशिक्षण गरज (Training Need Assessment- TNA) करणे व त्यानुसार प्रशिक्षणाचे मोडयुल, साहित्य विकसित करणे व तालुक्याचा गावनिहाय क्षमता बांधणी आराखडा तयार करून त्यानुसार गटांची क्षमता बांधणी करणे.

६. गटांना बचतीची सवय लावून त्यांच्यासाठी Micro Investment plan तयार करणे, मुख्य व्यवसायासाठी सक्षम करणे, बँकेचे कर्ज मिळविण्यासाठी प्रयत्नशिल राहणे. व्यवसाय सुरू करण्यात गटाला सहकार्य करणे व वस्तुंच्या पणन मार्केटिंग बाबत सहकार्य करणे.

७. गटांची प्रतवारी तयार करणे, आर्थिक साक्षरता (Financial Literacy) व संस्थात्मक बळकटीकरण करणे.

८. बचत गटांनी अंतर्गत कर्जव्यवहार व कर्जाची परतफेड करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

९. बँकांच्या अधिकाऱ्यांशी योग्य समन्वय राखून गटांना येणाऱ्या अडीअडचणी सोडवून गटांचे Bank Linkage वाढविणे.

१०. गट विकास अधिकारी यांना दरमहा अहवाल सादर करणे.

११. इतर अनुषंगीक कामे करणे.

## परिशिष्ट क्र. ३

## जाहिरातीचा नमूना

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, --------------

## जाहिरात क्र .----------/ दिनांक

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा -------------- मार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत Non-Intensive तालुक्यात बचत गटाची स्थापना, सक्षमीकरण, बळकटीकरण, संगोपन, क्षमता बांधणी इ. कामे करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांच्या कालावधीकरीता पंचायत समिती ---------------------- अंतर्गत गटसमन्वयकांच्या ------------------------- पदासाठी खालील शैक्षणिक पात्रता व अनुभव असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदे केवळ मानधनी व कंत्राटी असल्यामूळे कधीच शासकीय सेवेमध्ये कायम करण्यात येणार नाहीत. इच्छूक उमेदवारांनी दि. *---------------- रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत विहित नमून्यात अर्ज सादर करावा. अर्जाचा नमूना------------------या संकेतस्थळावर तसेच कार्यालय जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व सर्व पंचायत समित्यामध्ये उपलब्ध असेल. अर्ज सादर करताना राष्ट्रीयकृत बँकेचा रु. १००/- चा धनाकर्ष (D.D. Only) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा---------------- यांचे नावे काढणे आवश्यक आहे.  तसेच आवश्यक कागदपत्राच्या साक्षांकित प्रती, अलिकडील काळात काढलेले २ पासपोर्ट साईज फोटो व स्वत:चा पत्रव्यवहाराचा पत्ता टाकलेले २ लिफाफे जोडणे आवश्यक आहे.  प्राप्त अर्जाची छाननी करुन प्राप्त उमेदवारांची निवड लेखी व मौखिक परिक्षाद्वारे करण्यात येईल.  पदांच्या संख्येत बदल, शैक्षणिक व अनुभव निकषातील बदल करण्याचे अधिकार अथवा जाहिरात रद्द करण्याचे अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांना राहतील.

| | |
|---|---|
| पदाचे नांव | गट समन्वयक (पदसंख्या : ------------) |
| शैक्षणिक अर्हता | • उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापिठातून सोशल सायन्स अथवा समाजकार्य |

| | |
|---|---|
| | (B.S.W) शाखेतून पदवी उत्तीर्ण असावा. सोशल सायन्स अथवा समाजकार्य (M.S.W) किंवा Master in Business Administration (MBA) किंवा Post Graduation Diploma in Rural Development मध्ये पदव्युत्तर असल्यास उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे.<br>• मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे व उमेदवार MS-CIT उत्तीर्ण असल्यास प्राधान्य देण्यात यावे. |
| अनुभव | ग्रामीण भागात दारिद्य निर्मूलन कार्यक्रम, स्वयंसहायता गट स्थापना, क्षमता बांधणी, संस्थीय बांधणी, प्रशिक्षण गरज ओळखणे (Training Need Assessment ) प्रशिक्षण आराखडा तयार करणे, विविध स्तरावर प्रशिक्षणाचे आयोजन, गटाचे लेखे अद्यावत करणे, Bank Linkage, लोकसहभागावर आधारीत योजना, इ.कामाचा ३ वर्षाचा शासकीय कार्यालय किंवा स्वयंसेवी संस्थेतील कामाचा अनुभव असावा. |
| वयोमर्यादा | उमेदवाराचे वय शासनाने विहीत केलेल्या वयोमर्यादेप्रमाणे असावे. |
| कामाचे स्वरुप | प्रत्येक महिन्यात गावात किमान १५ दिवस मुक्काम, गटांच्या बैठकांना नियमीत उपस्थिती, अस्तित्वातील स्वयंसहायता गटांचे दर्जा उंचाविणे, समुदायात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्ती, (Best Practitioners) व बुककिपर यांचा शोध, प्रशिक्षणांचे आयोजन, आर्थिक साक्षरता, (Financial Literacy) व संस्थांत्मक बळकटीकरण, Bank Linkage इत्यादी कामे करणे. |

**दिनांक :**

**ठिकाण:**

**टीप:- विहीत नमुन्यात दिनांक / /२०१३ रोजी सायंकाळी ५.०० वाजे नंतर व विहीत नमुन्या व्यतिरिक्त असलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.**

अध्यक्ष

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद------------

# परिशिष्ट क्र. ४

## अर्जाचा नमुना

**Maharashtra State Rural Livelihoods Mission**

**District Rural Development Agency (DRDA)**

**Application Form for post of Block Co-ordinator**

| अलिकडील काळात काढलेला कलर पासपोर्ट फोटो स्वाक्षरीसह (Self attested) |
|---|

To,

The Chief Executive Officer,

Zilla Parishad --------------------

Subject : Application for the post of Block Co-ordinators under MSRLM

**SECTION A**

1. Applicant Details

| | |
|---|---|
| **Name (first-middle-last)** | |
| **Date of birth (dd-mm-yyyy)** | |
| **Age as on 01/02/2013** | |
| **Place of birth** | |
| **Category (SC,ST,SBC,VJ,NT (A,B,C,D), OBC, Open, etc.** | |
| **Sex** | **{ } Male { } Female** |
| **Permanent Address** | |
| | |
| | |
| | **Tel. No. : Mobile No. :** |
| **Current Address (If different than permanent address)** | |
| | |
| | |
| | **Tel. No. : Mobile No. :** |
| **Email ID** | |

**SECTION B**

**1. Educational details (From S.S.C. onwards)**

| College / Institute | University / Board | Qualification | Mark % | Year of Passing | Subjects / Specialization |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**2. Other Courses / Additional Qualification**

| Sr.No. | Title of the Course/ qualification/ award | Instiute/ University | Part Time/ Full Time | Duration & Year of passing |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**3. Computer Skill Details : (Examination Passed)**

1.

2.

3.

**SECTION C**

**1. Nature of present employment :- (contract / permanent)-**

**2. Expenditure Details**

| Sr.No. | Name of Organisation | Joining Date | Leaving Date | Total Experience (Year/Month/Day) | Position held | Role/ Nature of duties |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**SECTION D**

1. Any other information the applicant would like to mention : (Research papers, Publications) -----------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------

2. Details of Demand Draft (DD) – Number of DD -------------------------- Date of DD -------------- Name of Bank ----------------------------------, Branch --------------------

3. Two Self attested photos enclosed (Y//N)

4. Two Self addressed envelope enclosed (Y//N)

I, the undersigned, hereby declare that all the above information is valid and accurate to the best of my knowledge.

**Date :**

**Place :** **Signature**

**Note :**

1. The applications should reach to The Chief Executive Officer, Zilla Parishad ---------- by / / 2013 upto 5.00 p.m. (By post or through hand devliery only, electronic applications will not be considered.

2. All the candidates of the above positions should be conversant with computer operations.

3. Please attach attested copies of the relevant documents, the application may not be considered if not supported by relevant documents.

4. Applications which are not in prescribed form will be rejected.

************